# महाराष्ट्र शासन
## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**
**मॉडेल कॉलनी , बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६**

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in


जा. क्र : तंशिविकापु/शै.वि-४/२०२४/3800 दिनांक : 19 SEP 2024

**परिपत्रक-**

**प्रति,**

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
शासकीय,अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित
पदवी व पदविका संस्था (पुणे विभाग, पुणे)

**विषय : सन २०२४-२५ मधील राष्ट्रीय सेवा योजनेमधील विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क प्रती विद्यार्थी रू.६/- जमा करण्याबाबत.**

संदर्भ- १. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,शासन निर्णय क्र.रासेयो-२०२२/प्र.क्र.१०१/साशि-७, दि.२२.११.२०२२
२. संचालनालयाचे पत्र क्र.०९(२)/नियोजन/NSS Unit/२०२२/३६८ दि.१२.१२.२०२२
३. संचालनालयाचे पत्र क्र.ई-फाईल क्रमांक-डीटीईएम-डी९०प्लान/७३/२०२४-डेस्क-९
४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन पत्र क्र.रासेयो-२०२४/प्र.क्र.६२/रासेयो कक्ष, दि.०५.०९.२०२४

उपरोक्त विषयास अनुसरून शासनाच्या संदर्भ क्र.०१ च्या शासन निर्णयानुसार व संचालनालयाच्या संदर्भ क्र.०२ च्या पत्रान्वये या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त शासकीय, अशासकीय अनुदानित व विना अनुदानित पदवी व पदविका संस्थेकरिता स्वयंनिर्वाहीत राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी संख्या मंजूर करण्यांत आलेली आहे.

वरील विषयाबाबतच्या शासनाने संदर्भ क्र.४ च्या पत्रान्वये असे निर्देश दिले आहेत की, सन २०२४-२५ या वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत प्रती विद्यार्थ्यांमागे रू.१०/- हे शुल्क आकारण्यात यावे. त्यापैकी रू.४/- या कार्यालयाच्या खात्यात व उर्वरित रू.६/- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या नावे जमा करण्यात यावे.

त्यास अनुसरून या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्थांमध्ये रासेयो अंतर्गत विद्यार्थी संख्या मंजूर केलेल्या सर्व संस्थांना (शासन अनुदानित रोसेयो एकक व स्वयंसहाय्यित रासेयो एकक) प्रति विद्यार्थी रू.१०/- या प्रमाणे शुल्क आकारून त्यापैकी रू.६/- प्रति विद्यार्थी या प्रमाणे एकूण रक्कम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडील खालील नमुद तपशिलाच्या बँक खात्यात ऑनलाईन पद्धतीने NEFT/RTGS च्या माध्यमातून जमा करण्याबाबत व उर्वरित रक्कम रू.४/- प्रति विद्यार्थी या कार्यालयाच्या बँक खात्यामध्ये (प्रति विद्यार्थी रू.४/- याप्रमाणे एकूण रक्कमेचा धनाकर्ष सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्या नावे ) दि. २५.०९.२०२४ पर्यत जमा करण्यात यावे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ. पुणे यांचेकडील बँक खात्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| बँकचे नांव व शाखा | बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा- सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ |
| बँक खाते क्रमांक | २००६३०००४८५ |
| IFSC Code | MAHB०००१३५५ |

तरी या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक राबविणाऱ्या सर्व संस्थांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडे जमा केलेल्या रकमेचा एकत्रित तपशील (UTR नंबरसह) संचालनालयास सादर करण्यासाठी खालील तक्तयात या कार्यालयास दि.२५.०९.२०२४ पर्यंत सादर करावा.

| अ.क्र | संस्थेचे नांव | रासेयो अंतर्गत शासन अनुदानित/स्वयंनिर्वाहित तत्वावर मंजूर विद्यार्थी संख्या | रासेयो मध्ये नोंदणीकृत विद्यार्थी संख्या | संस्थेने प्रती विद्यार्थी रू.६/- प्रमाणे विद्यापीठास जमा केलेली रक्कम | रक्कम जमा केली असल्यास epay order/UTR क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|

( मारुती जाधव )
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- प्रोग्रामर, तं.वि.का. पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४९०, ६८५९७४०९ ई-मेल-desk9@dtemaharashtra.gov.in,
वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

ई-फाईल क्रमांक : **DTEM-D90PLAN/73/2024-DESK 9**

अतितात्काळ/ इ-मेलद्वारे

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
विभागीय कार्यालये,
मुंबई /पुणे /नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.

विषय : सन २०२४-२५ मधील राष्ट्रीय सेवा योजनेमधील विद्यार्थ्यांचे प्रवेश शुल्क प्रती विद्यार्थी रु.६/- सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे यांचे नांवे जमा करण्याबाबत..

संदर्भ :- १.महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : रासेयो-२०२२/ प्र.क्र.१०१/साशि-७, दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२.
२.संचालनालयाचे पत्र क्रमांक : ९(२)/नियोजन/NSS Unit/२०२२/३६८, दिनांक : १२.१२.२०२२.
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन पत्र क्र. रासेयो-२०२४/प्र.क्र.६२/रासेयो कक्ष, दि. ०५/०९/२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन शासनाच्या संदर्भ क्रमांक-१ च्या शासन निर्णयानुसार, संचालनालयाच्या संदर्भ क्रमांक-२ च्या पत्रान्वये आपल्या विभागातील शासकीय, अशासकीय अनुदानित व विना अनुदानित पदवी व पदविका संस्थेकरीता स्वयंनिर्वाहीत राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी संख्या मंजूर करण्यांत आलेली आहे.

२. वरील विषयाबाबतच्या शासनाने संदर्भ क्रमांक-३ च्या पत्रान्वये असे निर्देश दिले आहेत की, सन २०२४-२५ या वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत प्रती विद्यार्थ्यामागे रु.१०/- हे शुल्क आकारण्यात यावे. त्यापैकी रु.४/- विद्यापिठांनी आपल्या खात्यात जमा करुन उर्वरीत रु.६/- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या नांवे जमा करण्यात यावे.

27/6/08

३.  त्यास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील शासकीय,अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्थांमध्ये रासेयो अंतर्गत विद्यार्थी संख्या मंजूर केलेल्या सर्व संस्थांना (शासन अनुदानित रासेयो एकक व स्वयंसहाय्यित रासेयो एकक) प्रति विद्यार्थी रुपये १०/- या प्रमाणे शुल्क आकारुन त्यापैकी रु.६/- प्रति विद्यार्थी याप्रमाणे एकूण रक्कम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडील खाली नमूद तपशिलाच्या बँक खात्यात ऑनलाईन पध्दतीने NEFT/RTGS च्या माध्यमातून जमा करण्याबाबत व उर्वरीत रक्कम रु.४/- प्रति विद्यार्थी आपल्या कार्यालयाच्या बँक खात्यामध्ये दि. १५/०९/२०२४ पर्यत जमा करण्याबाबत आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडील बँक खात्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| बँकेचे नांव व शाखा | : | बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा- सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ |
| बँक खाते क्रमांक | : | २००६३०००४८५ |
| IFSC Code | : | MAHB०००१३५५ |

४.  आपल्या अधिपत्याखालील राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक राबविणा-या सर्व संस्थांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडे जमा केलेल्या रकमेचा एकत्रित तपशील (UTR नंबरसह) संचालनालयास दि.२५/०९/२०२४ पर्यत खालील तक्यात सादर करण्यात यावा.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | रासेयो अंतर्गत शासन अनुदानित/स्वयं निर्वाहित तत्वावर मंजूर विद्यार्थी संख्या | रासेयो मध्ये नोंदणीकृत विद्यार्थी संख्या | संस्थेने प्रती विद्यार्थी रु.६/- प्रमाणे विद्यापीठास जमा केलेली रक्कम | रक्कम जमा केली असल्या epay order/UTR क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

Signed by Shrikant Kawadu
Madawi
Date( 10-09-2024 16:53:18

सहाय्यक संचालक (तां)
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

प्रत : संचालक /प्राचार्य सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदवी,पदविका व तत्सम संस्था.